दै. सामना दि. 23/07/2022.

# गावठीकट्टा व बंदुकीची गोळी बाळगणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल


गावठीकट्टा व बंदुकीची गोळी बाळगल्याप्रकरणी अटक करण्यात आलेले युवक.

बिलोली, दि. २२ (सा.वा.)- बिलोली शहरातील गांधी चौक परिसरात राहणाऱ्या दोन युवकांना नांदेडच्या गुन्हे शाखेच्या पोलिसांनी गावठीकट्टा व बंदुकीची गोळी बाळगल्याप्रकरणी बिलोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नांदेडचे प्रभारी पोलीस अधीक्षक विजय कबाडे यांना मिळालेल्या माहितीनुसार त्यांनी ही माहिती स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक द्वारकादास चिखलीकर यांना दिली. या माहितीवरून चिखलीकर यांनी सहाय्यक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, पोलीस उपनिरीक्षक दत्तात्रय काळे, पोलीस अंमलदार विलास कदम, बालाजी यादगिरवाड आणि शेख कलीम यांना बिलोली उपविभागात पाठवले व मिळालेली माहिती पाठवलेल्या पथकाला दिली. पथकाला गांधी चौकात गोविंद हणमल्लु नुगरावार (३२) व्यवसाय शेती (रा. गांधी चौक, बिलोली) आणि विवेकानंद ऊर्फ राजू नरसिंहा सुर्गलोड (३२) (रा.गांधी चौक, बिलोली) असे दोन युवक भेटले. त्यांच्याकडे दुचाकी गाडी (एम.एच.२६ झेड.७५०९) होती. पोलीस पथकाने त्यांच्याकडे तपासणी केली असता एक लोखंडी गावठी कट्टा (अग्नीशस्त्र), एक ८ एमएम अशी बंदुकीची गोळी सापडली. पोलिसांनी ५० हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग व्यंकट माने यांच्या तक्रारीवरून बिलोली पोलीस ठाण्यात विवेकानंद सुर्गलोड आणि गोविंद नुगरावार यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

रिपब्लिकन गार्ड. दि. 23/07/2022

# फिल्मी स्टाईलने वजीराबाद पोलिसांनी दोन हल्लेखोरांना पकडले

नांदेड,(प्रतिनिधी)-चिखलवाडी भागात मोबाईल दुकानावर साहित्य खरेदी करून दुकानदारास तलवारीने मारहाण करून पळून गेलेल्या दोघांना वजिराबाद पोलिसांनी फिल्मी स्टाईलने राज्य राणी या रेल्वे गाडीतून शोधून काढले आणि अटक केली आहे.



चिखलवाडी भागात अब्दुल रौफ अब्दुल रज्जाक यांची जनता नावाची मोबाईल शॉपी आहे.दिनांक २१ जुलै रोजी रात्री ८ वाजेच्या नंतर दोन युवक तेथे आले आणि त्यांनी ब्लूटूथ हे उपकरण खरेदी केले.त्यानंतर पैश्यांच्या देवाण घेवाणीतून काहीतरी वादावादी झाली.तेव्हा त्या दोघांनी तलवारीने अब्दुल रौफला मारहाण केली. बाजारात झालेल्या या हल्ल्याने काही वेळ दहशत तयार झाली होती.

घटनेची माहिती मिळताच वजिराबादचे पोलीस निरीक्षक जगदीश भंडरवार यांनी अत्यंत गतिमान पद्धतीने आपले सहकारी पोल्सी उप निरीक्षक प्रवीण आगलावे,पोलीस अंमलदार मनोज परदेशी,व्यंकट ... संतोष बेलरोड,माणिक आव्हाड, संतोष ... मेहनत करायला लावली. एक एक पायरी पुढे सरकत पोलीस नांदेडच्या रेल्वे स्थानकात पोंहचले.

आता येथे तर महत्वपूर्ण कामगिरी होती.रेल्वे फलाटावर मुंबईला जाणारी राज्यराणी एक्प्रेस हि रेल्वे उभी होती. रेल्वे प्रवाशांना त्रास न होता हल्लेखोर शोधायचे होते.एकी कडून पोलीस गेले तर हल्लेखोरांना रेल्वेच्या दुसरीकडून पळून जाण्याची संधी होतीच.तेव्हा जगदीश भंडरवार यांनी आपल्यातील आणि आपल्या पोलीस पथकातील पोलीस बाजूला सारले आणि अत्यंत सहज भावाने नियोजन करून रेल्वेत प्रवेश केला.थोडीशी धावपळ पण झाली परंतु अब्दुल रौफवर तलवारीने हल्ला करणारे दोन वजिराबाद पोलिसांनी अखेर पकडलेच.

पकडलेल्या दोघांमधील एकाचे नाव अमरजितसिंग सेवकसिंग राठोड (१९) असे आहे.दुसरा एक १७ वर्षीय विधी संघर्षग्रस्त बालक आहे. मुळात हा लहान बालक मूळात पंजाबचा राहणार आहे.सध्या तो आजीकडे आलेला ... झालेल्या वादातून हल्ला करून